शासन शुध्दीपत्रक - राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत /पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अनुदान वितरित करण्यास मंजूरी देण्याबाबत सन २०१६-१७.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक : ग्राक्षेवि - २०१७/प्र.क्र.३८(भाग-२)/का.९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- ०९ मार्च, २०१८.

वाचा :- १. शासन निर्णय,अल्पसंख्याक विकास विभाग, ग्राक्षेवि- २०१७/प्र.क्र.३८/का.९, दि. ३१ मार्च, २०१७.
२. शासन निर्णय वित्त विभाग क्र. संकीर्ण १०.१७ // प्र.क्र. ६४/ अर्थोपाय, दि.२१ सप्टेंबर,२०१७.

शासन शुध्दीपत्रक :-

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयासोबत असलेल्या **परिशिष्ट "अ" मधील अ. क्र. १२** येथील हिंगोली **जिल्हातील तालुका हिंगोली येथील चिंचोळा या ग्रामपंचायतीला "बौध्द वस्तीत पाईपलाईन करीता "** या विकास कामाला दिलेली मंजूरी रद्द करण्यात येत आहे. त्या ऐवजी खालील प्रमाणे ग्रामपंचायत तसेच कामात बदल करण्यात येत आहे. सदर काम पुढीलप्रमाणे वाचण्यात यावे.

अ. क्र.	जिल्हा	तालुका	ग्रामपंचायतीचे नाव	कामाचे नांव	मंजूर निधी (रू. लक्ष)
१२	हिंगोली	वसमत	मौजे आडगाव रंजेबुवा	मुस्लीम कब्रस्तान संरक्षण भिंत व सिमेंट रस्ता करण्याकरिता	१०.००

संदर्भ क्र. २ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने उपरोक्त काम दि. ३१ मार्च २०१८ पूर्वी पूर्ण करणे जिल्हाधिकारी, हिंगोली यांना बंधनकारक राहील.

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०३०९१२२२२९२८१४ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.03.09 12:23:46 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,

४. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
५. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
६. महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा) , मुंबई / नागपूर,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
९. संबंधित जिल्हाधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद
१०.संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद
११.मा.मंत्री/ राज्यमंत्री (अल्पसंख्याक विकास) यांचे खाजगी सचिव,
१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी),
१३. निवडनस्ती.